# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### पुणे शहरातील बेकायदा बांधकामाविरोधात शासनाने केलेल्या कारवाईबाबत

**(१) १३११ (१३-०४-२०२०). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरालगतच्या ग्रामीण परिसरातील बांधकामे पाडण्याची कारवाई मोठ्या प्रमाणात माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर कारवाई दरम्यान पाडण्यात आलेल्या बांधकामांचा तपशील काय आहे,

(३) तसेच या परिसरात अनेक वर्षापासून लहान घरे बांधून वास्तव्य करत असलेल्या ग्रामस्थांची बांधकामे नियमित करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांनी सर्व पक्षीय मोर्चा काढून जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय ,

(४) असल्यास, लहान घरांची बांधकामे, गुंठेवारी किंवा अन्य कायद्यानुसार नियमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) नोव्हेंबर-२०१९ मध्ये पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून निष्कासित करण्यात आलेल्या १४ अनधिकृत बांधकामामध्ये निवासी-३,अपार्टमेंट-५, औद्योगिक-२,वाणिज्य -२ व ओढ्यावरील राडारोडा-२ अशी आहेत.

(३) या विभागात दिसून आले नाही.

(४) सदर बाबतीत शासन स्तरावरून ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमाक. प्रआय/२०१७ /प्र.क्र.३४८ /योजना१०, दिनांक.१६/२/२०१८ अन्वये "सर्वासाठी घरे २०२२" या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकुल करण्याच्या धोरणात सुधारणा करण्याबाबत शासन निर्णय पारित करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या निधीत कोटयवधींचा अपहार झाल्याबाबत

**(२) २५०५ (१५-०४-२०२०). श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील दगडधर, काळी दौ., पिंपळगांव (ता. महागाव,जि.यवतमाळ) इत्यादी ग्रामपंचायतीत सचिवांनी जलशुध्दीकरण यंत्र बसवण्याच्या नावाखाली अपहार केल्याची तक्रार श्री. अनंत नागरगोजे यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ई-टेंडरला बगल देऊन तालुक्यातील सचिवांनी ग्रामपंचायतीत खरेदी केलेल्या व बांधकाम केलेल्या प्रत्येक कामात अपहार केला असून पंचायत समिती सभापती यांनी गटविकास अधिकाऱ्यांना पत्र देऊन चौकशी करण्याचे निर्देश देऊन ही अद्यापी चौकशी अहवाल आला नसल्याचे निर्देशनास येते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मौजे बोरी, अरब (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) येथे जलशुध्दीकरण यंत्र बरेच वर्षा पासून बंद असून त्याबाबत ग्रामपंचायत यांनी सदर जलशुध्दीकरण यंत्र दुरुस्त करुन देणेबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे निवेदन देण्यात आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, बोरी अरब येथील जलशुध्दीकरण यंत्र बंद असल्यामुळे लोकांना दुषित पाणी पुरवठा करण्यात येत असल्याने मोठया प्रमाणात आजारांना समोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय चौकशी अंती काय अढळून आले तद्अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

गट विकास अधिकारी पंचायत समिती महागाव यांचे पत्र क्र.४९२ दिनांक.१३/०३/२०२३ अन्वये अहवाल प्राप्त झालेला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही,

आज रोजी ग्रामपंचायत स्तरावर नियमित जलशुद्धीकरण करून पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कुमठा बु. ( ता. अहमदपूर, जि.लातूर) येथील कब्रस्थानाची संरक्षक भिंत बांधणेबाबत**

**(३) ५६६७ (१०-०४-२०२०). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कुमठा बु ( ता.अहमदपूर, जि.लातूर) येथील कब्रस्थानाची संरक्षक भिंत संबंधित तहसिलदार ,पोलीस निरीक्षक, भूमिअभिलेख कर्मचारी, सरपंच , उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनी संगनमत करुन पाडली असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जागेबाबत काही दृष्टप्रवृत्तीचे लोक जातीय तेढ निर्माण करत असून अशा व्यक्तींना संबंधित प्रशासनही साथ देत असल्याने सदरहू कब्रस्थानाची दुरवस्था होऊन त्याचे पावित्र्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, संबंधित भूमिअभिलेख रेकॉर्ड, सिटी सर्व्हे नं २१४ व ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ४७० नुसार अणि वक्फ बोर्डाच्या गॅझेट मध्ये असलेल्या नोंदीनुसार सदरहू जागा ही कब्रस्थानची असल्याने सदरहू कब्रस्थानाला संरक्षक भिंत बांधून देण्याबाबत संबंधित मंत्री महोदयांना उचित कार्यवाही करण्याबाबत निवेदन देवूनही अद्याप कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संरक्षण भिंत बांधण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-१२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

केवळ अतिक्रमित जागे वरील बांधकाम नियमानुसार पाडण्यात आले आहे.

(२) नाही, हे खरे नाही,

(३) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार सदयस्थितीत प्रकरण न्यायप्रवीष्ठ असल्याने न्यायालयाच्या निकाला नंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) सदयस्थितीत प्रकरण न्यायप्रवीष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ३ हजारापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये आयटीआय पात्र ग्रामविद्युत सेवक म्हणून नियुक्ती करणेबाबत

**(४) ७३०६ (१६-०४-२०२०). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३ हजारापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये आयटीआय पात्र ग्रामविद्युत सेवक म्हणून नियुक्ती करण्यासाठी ६५८१ ग्रामपंचायतीकडून प्रस्ताव आले असून यापैकी केवळ ५२२ ग्रामपंचायतीनी ग्रामविद्युत सेवकांच्या नियुक्त्या केल्या असल्याचे दिनांक १७ डिसेंबर,२०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालेगांव (जि. वाशिम) तालुक्यातील ४० ग्रामपंचायतीनी ग्रामविद्युत व्यवस्थापक नेमण्याचा ठराव दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मात्र या नियुक्त्या फक्त ५ जिल्हयात झाल्या तर उर्वरित ३१ जिल्हयात एकही विद्युत व्यवस्थापकांची नियुक्ती करण्यात आली नाही , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात शासनाने माहिती घेवून मालेगांव तालुक्यासह राज्यातील ग्रामीण भागात विजेबाबत समस्या मिटविण्यासाठी ग्रामविद्युत व्यवस्थापक उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे,
(३),(४) व (५) राज्यातील बहुतांश जिल्हा परिषदामधील ३००० पेक्षा कमी लोकसंख्येपर्यंतच्या ग्रामपंचायती मध्ये ग्रामपंचायतीने पात्रतेनुसार निवड केलेल्या ग्राम विद्युत व्यवस्थापकांना महावितरण कंपनी मार्फत आवश्यक ते कौशल्य प्राप्त असल्याचे प्रमाणपत्र देण्यात आल्यानंतर नेमणूक दिली जाते. परंतु महावितरण कंपनीकडून ग्रामविद्युत व्यवस्थापकांना दयावयाचे प्रशिक्षण अपूर्ण असल्याने व महावितरण कडील प्रमाणपत्र प्राप्त नसल्याने ग्रामविद्युत व्यवस्थापकांना नियुक्ती देता आलेली नाही.

---

## महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील ग्रामपंचायती मध्ये आरो प्लांट बसविण्याच्या कामात गैरव्यवहार झालेबाबत

**(५) ३६२२९ (०७-०१-२०२२). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागाव तालुक्यातील (जि.यवतमाळ) तसेच जिल्हयातील अनेक ग्रामपंचायती मध्ये आरो प्लांट चे काम करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरो प्लांट हा १० बाय १५ आकाराच्या शेडमध्ये ५०० लिटर क्षमतेचे उभारावे लागते, मात्र, कमी रुंदीच्या शेडमध्ये उभारले असून आरो प्लांट शेड व इतर साहित्यासह ३ लाख २० हजारात निधी लागला असून सदर कामावर ७ लाख ४० हजार रुपयांचे देयके काढली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरो प्लांटचे साहित्य व मोटर पुर्णतः ISI दर्जाचे असने अभीप्रेत असून मेमरण, वेसल, डोजिंग पंप वापरण्या ऐवजी लोकल कंपनी व कमी किमतीच्या साहित्यांचा वापर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर अंदाजपत्रकानुसार फिल्टर मशीनमध्ये CRI किंवा टेक्समो कंपनीचे साहित्य वापरावे लागते. मात्र या कंपनीच्या साहित्याचा कुठेही वापर झाला नसून राजकीय पातळीवरच टेंडर मॅनेज करण्याचा प्रकार अवलंबविण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यवतमाळ जिल्हयातील ७७ ग्रामपंचायती मध्ये RO Plant बसविलेल्या ४७ गावातील नागरिकांनी RO Plant बंद असल्याची तक्रार देऊन अद्याप पर्यंत कोणतीही कारवाई न झाल्याचे निर्देशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-१२-२०२३) :** (१) होय,हे खरे आहे,
(२) नाही,हे खरे नाही,
(३) नाही ,हे खरे नाही,
(४) नाही,हे खरे नाही,
(५) नाही ,हे खरे नाही,
(६) प्रश्न उद्भवत नाही.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुल (जि.चंद्रपूर) तालुक्यातील जनसुविधा योजनेच्या निधीत लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(६) ३८६८८ (०७-०४-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुल (जि.चंद्रपूर) तालुक्यातील जनसुविधा योजने अंतर्गत बांधकाम करण्यासाठी प्राप्त झालेल्या शासकीय निधीमध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जून, २०२१ मध्ये वा त्यासुमारास निर्दशनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याची मागणी सरपंच यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-१२-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी चौकशी करून संबंधित ग्रामसेवक यांच्या विरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करून दि.१६.६.२०२१ रोजी ग्रामसेवक, ग्रामपंचायत नांदगांव यांना निलंबित केले आहे. तसेच या प्रकरणी तत्कालिन सरपंच व सचिव दोषी आढळल्याने त्यांच्यावर दि.१४.१०.२०२१ रोजी पोलीस ठाणे, मूल येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### एडवण (जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(७) ४६२७८ (११-१०-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एडवण (जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात २७ मंजूर पदांपैकी १५ पदे रिक्त असल्याने आरोग्य कर्मचाऱ्यां बरोबरच वैद्यकीय अधिकारी वेळेवर हजर राहत नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एडवण प्राथमिक आरोग्य केंद्राची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, या आरोग्य केद्रातील रिक्त असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांसह अन्य आरोग्य कर्मचाऱ्यांची पदे तात्काळ भरण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-११-२०२३) :** (१) हे खरे नाही. प्राथमिक आरोग्य केंद्र एडवण, ता.जि.पालघर येथे आकृतीबंधानुसार १५ मंजूर पदांपैकी १० पदे भरलेली असून ५ पदे रिक्त आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वेळेवर हजर राहून रुग्णांना सेवा देतात.
(२) जिल्हास्तरीय अधिकारी व तालुका आरोग्य अधिकाऱ्यामार्फत प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट देण्यात येते.
(३) जिल्हा परिषद, पालघर यांचेकडून गट-क मधील आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, आरोग्य पर्यवेक्षक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ व औषध निर्माण अधिकारी यांसह इतर संवर्गातील एकूण ९९१ रिक्त पदांची सरळसेवा पदभरतीची जाहिरात दि.०५ ऑगस्ट, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. वैद्यकीय अधिकारी व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ग्रामपंचायत नांदप (ता. कल्याण) येथील अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झालेबाबत

**(८) ४६७५४ (०९-१०-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत नांदप (ता. कल्याण) येथील अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाली असून स्थानिक नागरिकांना वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अपघाताचे प्रमाण वाढले असल्याची बाब दिनांक १ जून, २०२२ रोजी व त्या सुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी सदर गावातील अंतर्गत रस्ते चे काम पूर्ण करण्यासाठी विभागाकडे वारंवार मागणी करून देखील १ रु. चा निधी देखील विभागाने उपलब्ध करून दिला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नांदप येथील अंतर्गत रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी ग्रामविकास विभागाने २५१५ अंतर्गत निधी देणेबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशी अंती काय निदर्शनास आले तसेच उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०१-२०२४) :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.
(३) व (४) लेखाशीर्ष २५१५ १२३८ (मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे) या योजनेंतर्गत मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना शासन मान्यतेने मंजूरी देण्यात येते. सन २०२३-२४ मध्ये स्थानिक मा. लोकप्रतिनिधींची मागणी विचारात घेऊन शासन मान्यतेने नांदप गावासाठी रु.३.०० लक्ष रक्कमेच्या कामास मंजूरी देण्यात आली आहे. तसेच, स्थानिक मा.लोकप्रतिनिधींची मागणी विचारात घेऊन शासन मान्यतेने ठाणे

जिल्ह्यातील कल्याण तालुक्यासाठी रु.२००५.०० लक्ष व भिवंडी तालुक्यासाठी रु.१३.८० लक्ष रक्कमेच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. लेखाशिर्ष २५१५ १२३३८ योजनेंतर्गत सदर ठिकाणी विकास कामे घेण्यास मा.लोकप्रतिनिधींना मुभा आहे. सबब, योजनेतील अटी व शर्तीनुसार त्यातून सदर ठिकाणी विकास कामे करणे शक्य आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सतखेडा (ता.धरणगाव, जि.जळगाव) येथील सरपंचांना संगणक प्रणालीतील तांत्रिक अडचण दुरुस्त करणेबाबत**

**(९) ४९५२७ (१९-०१-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सतखेडा (ता.धरणगाव, जि.जळगाव) ग्रामपंचायतीमधील सरपंचांसह राज्यातील बऱ्याच सरपंचांना राज्याची आर ओ कॉम्प्युटर प्रणाली ना-दुरुस्त असल्यामुळे गेले दोन ते अडीच वर्षांपासून मानधनापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने राज्यातील सरपंचांना वेळेत मानधन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-१२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) ग्रामपंचायत सतखेडा (ता.धरणगांव,जि.जळगाव) येथील ERP संगणक प्रणालीमधील तांत्रिक अडचण दुरुस्त करण्यात आली असून,संबधित सरपंच यांना त्यांच्या कार्यकाळातील संपूर्ण मानधन अदा करण्यात आलेली असल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या माध्यमातून विकासकामे करताना ग्रामपंचायतीचा ना-हरकत दाखला मिळण्यास विलंब होत असलेबाबत**

**(१०) ४९९६९ (२१-०१-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या माध्यमातून ग्रामपंचायतीमार्फत अनेक विकासकामे करताना ग्रामपंचायतीचा ना-हरकत दाखला मिळण्यास बराच अवधी लागत असल्याने विकास कामे करण्यास अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणामुळे कामे प्रलंबित राहत असून निधीही अखर्चीत राहत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने सदरहू हद्दीतील विकास कामे करण्यासाठी ग्रामपंचायतीचा ना-हरकत दाखला तातडीने मिळणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-१२-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गांधीनगर गुजरात येथे डिफेन्स एक्सपो अन्वये गुंतवणूक करणेबाबत**

**(११) ५२७५७ (१८-०१-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात संरक्षण संबंधित उद्योगांना चालना मिळण्याकरीता केंद्र शासनाच्या वतीने गांधीनगर, गुजरात येथे डिफेन्स एक्सपो माहे ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान आयोजित करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ,संरक्षण संबंधित गुंतवणूक राज्यात यावी यासाठी सदरील डिफेन्स एक्सपो मध्ये शासनाच्या वतीने सहभाग नोंदविण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) याबाबत गुंतवणुकीसाठी शासनाच्या वतीने करार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०१-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) या परिषदेमध्ये गुंतवणूकीसंदर्भात करार करण्यात आले नाहीत. मात्र संरक्षण क्षेत्रात गुंतवणूक होणेकामी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औसा (जि.लातूर) येथील एमआयडीसीमध्ये उद्योजकांना उद्योगासाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत**

**(१२) ५४९६० (१८-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या सूक्ष्म लघु उपक्रम समुह विकास योजनेच्या धर्तीवर औसा (जि.लातूर) येथील एमआयडीसीमध्ये उद्योजकांना उद्योगासाठी जागा नसल्यामुळे अतिरिक्त एमआयडीसीसाठी भूसंपादन करून एमआयडीसी विकसित करण्याबाबत तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (३०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कासार सिरशी (ता.निलंगा) येथील वन विभागाची जमीन ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करण्याबाबत**

**(१३) ५५५७८ (२४-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासार सिरशी (ता.निलंगा,जि.लातूर ) या गावासाठी मंजूर असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गतच्या पाणीपुरवठा योजनेच्या जलकुंभ बांधकाम,जलशुद्धीकरण व सौर उर्जा प्रकल्पासाठी स.न.२०७ मधील आरक्षित वन विभागाची आवश्यक जमीन सार्वजनिक कामासाठी ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करण्याबाबत ग्रामपंचायतीने माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) मौजे.कासार सिरशी (ता.निलंगा जि.लातूर) मधील कक्ष क्र.१४१ A मधील सर्वेक्र./गट नं.२०७ क्षेत्र ०.२३४ हे.आर.मध्ये जल जीवन मिशन अंतर्गत,मंजूर कामे करण्यास विभागीय वन अधिकारी, प्रादेशिक उस्मानाबाद यांनी त्यांच्या कडील दि.२३/०८/२०२३ च्या आदेशानुसार मंजुरी दिली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कौशल्य विकास व रोजगार यांच्या प्रशिक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा निधी शिल्लक राहिल्याबाबत**

**(१४) ५७०७९ (२४-०४-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कौशल्य विकास व रोजगार यांच्या प्रशिक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या चार प्रमुख योजनांचा ५४ कोटी निधी शिल्लक रहात असल्याचे विभागाच्या परफॉर्मन्स बजेट अहवालातून माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्याच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता विभागाकडे नोकरीच्या शोधात असलेल्या ५६ लाख ४० हजार तरुणांनी नोंदणी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार जास्तीत जास्त तरुणांना रोजगार, कौशल्य, उद्योजकता देण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२९-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.वित्त विभागाकडून कोविड साथीच्या प्रादुर्भावामुळे वित्तीय महसूल खर्चात बचत करण्याच्या अनुषंगाने योजनांचा निधी खर्च करण्यावर निर्बंध घालण्यात आले होते. तसेच कोविड साथीच्या प्रादुर्भाव वाढू नये म्हणून या कालावधीत प्रशिक्षण केंद्रे बंद ठेवण्यात आली होती. त्यामुळे सन २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये प्रमोद महाजन कौशल्य विकास योजना या अभियानांतर्गत वितरीत निधी खर्च करण्यावर मर्यादा आल्या तसेच प्रशिक्षणाचा कालावधी हा १८ महिने इतका असल्याने, सदर निधी वित्तीय वर्षात खर्च होत नाही. उपरोक्त कारणास्तव रु. ५४.०० कोटी इतका निधी शिल्लक असल्याचे दिसून येत आहे.
(२) होय, हे खरे आहे. नोंदणीकृत उमेदवारांची माहिती रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राची सुरवात झाली तेव्हापासूनची क्रमवर्धित माहिती असल्याने ती ५६ लाख ४० इतकी दिसून येत आहे. या विभागाच्या महास्वयंम पोर्टलवर नोंदणी झालेले मागील तीन वर्षाचे इच्छुक उमेदवार, अधिसूचित रिक्त पदे, नोकरीस लागलेले उमेदवार इत्यादीबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | उमेदवार नोंदणी | अधिसूचित रिक्त पदे | नोकरीस लागलेले उमेदवार | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०२० | ५७५१२३ | ८०१८९६ | १९९४८६ | ३४ % |
| २ | २०२१ | ४९३५१३ | ६१७८७४ | २१९१५६ | ४४ % |
| ३ | २०२२ | ४८७३५८ | ८५१०६७ | २४८९५० | ५१ % |
| ४ | जून, २०२३ अखेर | ३४५२०७ | ४०५९८० | ९७३०० | २८ % |

तसेच इतर विविध मार्गांद्वारे उमेदवारांना रोजगाच्या संधी उपलब्ध झाल्या असून याबाबतची माहिती या टक्केवारीमध्ये समाविष्ट नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील युवकांच्या बेरोजगारीची समस्या सोडविण्यासाठी रोजगार मेळावे, रोजगार प्रोत्साहनपर कार्यक्रम, किमान कौशल्य विकास, ग्रंथालयसदृश्य अभ्यासिका, बेरोजगारांच्या सेवा सहाकारी संस्था स्थापन करणे, ऑनलाईन समुपदेशन, मॉडेल करीअर सेंटर इत्यादी योजना राबविल्या जातात. कौ. रो. उ. व ना. विभागाच्या नोकरीच्या शोधात असलेल्या उमेदवारांकरीता "महास्वयंम" पोर्टलवर उमेदवारांची नोंदणी व नोंदणीचे अद्ययावतीकरण करणे, मुलाखतीसाठी उमेदवारांना एसएमएस करणे, नोकरीच्या संधी शोधून ऑनलाईन अर्ज करणे, रोजगार कॅलेंडर पहाणे, रिक्तपदे अधिसूचित करणे, वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींची माहिती वेबपोर्टलवर उपलब्ध करुन देणे, उद्योजकांसाठी ईआर-१ तिमाही विवरणपत्रे ऑनलाईन भरणे, यांसारख्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.राज्यात ४,४९,००० बेरोजगार उमेदवारांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून ४९० उद्योजकांसोबत "सामंजस्य करार" करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्हातील शासकीय जिल्हा क्रीडा संकुलाचे व्यावसायिकरण करणेबाबत

**(१५) ५८०१३ (२५-०४-२०२३). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील शासकीय जिल्हा क्रीडा संकुलाचे व्यावसायिकरण करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी, अकोला यांनी त्यांचे पत्र क्र. जिक्रीस/ जाहीरात/२०२२/४७० दिनांक ७ जून २०२२ अन्वये खाजगी व्यावसायीकांकडून निविदा मागविण्यासाठी जाहीरात प्रसिध्दीची कार्यवाही केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त जिल्हा क्रीडामैदानावरील धावपथ या सह इतरही क्रीडांगणे व्यावसायीक तत्वावर चालविण्यासाठी कंत्राटदारास देण्याचा निर्णय घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर क्रीडांगणावरील सामान्य नागरीकांकडून आरोग्यदायी व्यायामासाठी वापरल्या जाणाऱ्या धावपथासाठी प्रतीव्यक्ती प्रतीमाह १०००/- रू. आकारण्यात येणार, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सामान्य नागरीकांकडून व्यायामासाठी नि:शुल्क वापरण्यात येणारी शासकीय क्रीडा संकुले आता स: शुल्क खाजगी तत्वावर देण्याचा शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय झाला आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (१७-११-२०२३) :** (१), (२) होय.

(३) व (४) महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरणानुसार महाराष्ट्र स्पोर्टस इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्लॅन अंतर्गत शासन निर्णय दिनांक ७.१२.२००५ अन्वये संकुल व त्या अंतर्गत असलेल्या सर्व सुविधांचे व्यवस्थापन व देखभाल दुरुस्तीसाठी कंत्राटदार नियुक्त करण्याबाबत तरतूद आहे. त्यानुसार जिल्हा क्रीडा संकुल समिती, अकोला यांनी संकुलातील क्रीडा सुविधा कंत्राटी तत्वावर उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रत्येक क्रीडा सुविधेसाठी रु.१००/- मासिक शुल्क आकारण्यात येणार आहे. जिल्हा क्रीडा समिती अकोला, यांनी प्रसिध्द केलेल्या ई-निविदा प्रक्रीयेस सद्यस्थितीत स्थगिती देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपळगाव बसवंत (ता.निफाड, जि.नाशिक) येथे नवीन क्रीडा संकुल उभारणेबाबत

**(१६) ५८५३५ (२७-०४-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव बसवंत (ता.निफाड, जि.नाशिक) येथे नवीन क्रीडा संकुल उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान क्रीडा मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने तसा प्रस्ताव आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावास शासनाने अद्यापही मंजुरी दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२९-०१-२०२४) :** (१) होय.
(२) होय.
(३) राज्य क्रीडा विकास समितीच्या दिनांक २६.१०.२०२३ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार तालुका क्रीडा संकुल, निफाड साठी क्रीडा सुविधा निर्मिती करण्यास उपलब्ध जागा अपर्याप्त असल्यामुळे, पिंपळगाव बसवंत, येथील भूमापन क्र.५८८, उपविभाग ४/१ येथील २.१५ हे. शासकीय जागेवर तालुका क्रीडा संकुलाच्या अतिरिक्त (विस्तारीत) क्रीडा सुविधा निर्माण करण्यास दिनांक २६.०३.२००३ च्या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने दि.२२.११.२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय कौशल्य विकास मिशन अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या प्रायोगिक/मार्गदर्शक प्रकल्पामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था औसा या संस्थेचा समावेश करणेबाबत**

**(१७) ६०४०८ (२७-०४-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातूर) हा तालुका संपूर्ण भूकंपग्रस्त असून या भागातील विद्यार्थ्यांना सद्याच्या उद्योगधंद्यासाठी आवश्यक असे तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी तसेच बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास मिशन अंतर्गत राज्यात मंजूर करण्यात येत असलेल्या प्रायोगिक/मार्गदर्शक प्रकल्पामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था औसा या भूकंपग्रस्त भागातील संस्थेचा समावेश करण्याची मागणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रायोगिक/मार्गदर्शी प्रकल्पांना शासनाने मंजूरी दिली आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त प्रकल्पामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था औसा या संस्थेचा समावेश करण्याबाबत तसेच प्रायोगिक/मार्गदर्शक प्रकल्पांना मंजूरी मिळणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०२-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व ३) राष्ट्रीय कौशल्य विकास मिशन अंतर्गत राज्यातील युवक व युवतींसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत अल्पमुदत अभ्यासक्रमाच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात येते. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा जि. लातूर या संस्थेच्या परिसरातील युवक व युवतीकरीता कौशल्य प्रशिक्षण मिळण्यासाठी संस्थेतील उपलब्ध साधनसामुग्रीच्या आधारे २ अल्पमुदतीचे अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर संस्थेत Self Employed Tailor व Electrician Domestic Solution अशा अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांना मान्यता व महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ यांचे मार्फत संलग्नता देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळंब येथील तालुका क्रीडा संकुलासाठी निधी मिळण्याबाबत

**(१८) ६१००८ (२७-०४-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक २३ मार्च २०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येणाऱ्या तसेच अद्याप बांधकाम सुरू न झालेल्या तालुका क्रीडा संकुल अनुदान मर्यादा रुपये १००.०० लक्ष वरून ५००.०० लक्ष, जिल्हा क्रीडा संकुल अनुदान मर्यादा ८००.०० लक्ष वरून २५००.०० लक्ष व विभागीय क्रीडा संकुल अनुदान मर्यादा २४००.०० लक्ष वरून ५०००.०० लक्ष रुपये करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय/जिल्हा/तालुका क्रीडा संकुलाच्या अंदाजपत्रकास/ सुधारित अंदाजपत्रकास यापूर्वीच प्रशासकीय मान्यता दिली असून व त्यांचे बांधकाम पूर्ण झाले आहे अथवा प्रगतीपथावर आहे/अपूर्ण अवस्थेत आहे अशा क्रीडा संकुल बाबत, तालुका क्रीडा संकुलासाठी ३००.०० लक्ष, जिल्हा क्रीडा संकुलासाठी १५००.०० लक्ष व विभागीय क्रीडा संकुलासाठी ३०००.०० लक्ष याप्रमाणे अनुदान मर्यादा विहित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कळंब येथील तालुका क्रीडा संकुलाचे काम यापूर्वीच पूर्ण झाले असून सदरील शासन निर्णयानुसार ३००.०० लक्ष रुपये अनुदान वितरित करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदरील शासन निर्णयानुसार कळंब येथील तालुका क्रीडा संकुलासाठी ३००.०० लक्ष अनुदान रुपये वितरित करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (०८-११-२०२३) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) तालुका क्रीडा संकुल, कळंब करीता रक्कम रु. ३६४.४१ लक्ष एवढया रक्कमेचे सुधारित अदांजपत्रकास राज्य क्रीडा विकास समितीच्या दि.२२.०६.२०२३ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार उपलब्धतेनुसार निधी वितरीत करण्याची तजविज ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हा परिषदेत समाज कल्याण व पंचायत विभागात
## वर्ग एक दर्जाचा अधिकारीचे पद भरणेबाबत

**(१९) ६४२८० (०३-०५-२०२३). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा परिषदेत समाजकल्याण व पंचायत विभागाला वर्ग एक दर्जाचा अधिकारी मिळत नसून सिंचन विभागातील कारभार हा शाखा अभियंताद्वारे होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सिंचन विभागातील कार्यकारी अभियंत्याला अकार्यक्षमतेचा दाखला देत नाटीस बजावलेली असून या संदर्भातील अहवाल पाच महिने होऊनही सादर करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच जिल्हा परिषदेत सहायक गटविकास अधिकारी ( श्रेणी-२) पद असलेल्या श्री.शिवराज केंद्रे यांच्याकडे दोन विभागाच्या प्रमुखाचा भार देण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पंचायत विभागाच्या उपमुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांच्या खूर्चीत बसून सहायक गटविकास अधिकारी (श्रेणी-२) हे क्लास वन असलेल्या बीडीओना निर्देश देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने संबंधीत अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०८-०२-२०२४) :** (१) छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेत समाजकल्याण, पंचायत विभाग आणि सिंचन विभागास वर्ग १ अधिकारी यांचे प्रत्येकी १ पद मंजूर आहे. ग्राम विकास विभाग, शासन आदेश दि.२३.०३.२०२३ रोजीच्या आदेशान्वये उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचायत), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर या पदावर श्री.ओ.आर.रामावत यांची पदस्थापना करण्यात आली आहे.जिल्हा समाजकल्याण अधिकारी,जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर हे पद दि.१५.०५.२०१९ पासून रिक्त असून सद्यस्थितीत सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचायत), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. तसेच जिल्हा संधारण अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर हे पद दि.२४.०५.२०२३ पासून रिक्त असल्याने सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार उपअभियंता, सिंचन विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.
(२) जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना सिंचन विभागाचे अधिनस्त असलेल्या यंत्रणा व मनुष्यबळावर प्रभावी नियंत्रण ठेवणे व अन्य महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांबाबत कामकाज असमाधानकारक असल्याने दि.२३.०५.२०२३ रोजीच्या आदेशान्वये एकतर्फी कार्यमुक्त करून त्यांच्या सेवा मूळ प्रधिकरणाकडे परत करण्यात आल्या आहेत.
(३) व (४) उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांच्या पदोन्नतीमुळे सदर पद दि.०२.०१.२०२३ रोजी रिक्त झाल्यामुळे श्री.एस.एन.केंद्रे, सहायक गट विकास अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. तथापि, दि.२३.०३.२०२३ रोजीच्या आदेशान्वये उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर या पदावर श्री.ओ.आर.रामावत यांची पदस्थापना करण्यात आलेली आहे.तसेच जिल्हा समाजकल्याण अधिकारी,जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर हे पद रिक्त असल्याने दि.२०.१०.२०२१ पासून सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.एस.एन.केंद्रे, सहायक गट विकास अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सोपविण्यात आला होता.तथापि, सद्यस्थितीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचायत), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदयोजकांना वेळेत परवानग्या देण्यासाठी मैत्री कायदा अंमलात आणणेबाबत**

**(२०) ६४५९९ (२८-०८-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उदयोजकांना वेळेत परवानग्या मिळण्यासाठी मैत्री कायदा दिनांक १२ मे,२०२३ रोजी वा त्या सुमारास अध्यादेश काढण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कायदयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त अध्यादेश अंमलात येणाच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२६-१०-२०२३) :** (१) होय हे खरे आहे, उद्योग स्थापन करण्यासाठी व कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेल्या परवानग्या देण्याबाबत सुविधा पुरविण्याबाबत तसेच इतर अनुषंगीक सेवांसाठी एक खिडकी

प्रणाली तयार करणे व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ४ दि. ०३/०७/२०२३ रोजी अध्यादेश काढण्यात आला आहे. सदर अध्यादेशाचे महाराष्ट्र अधिनियम क्र.३४/२०२३ दि. १४/०८/२०२३ अन्वये अधिनियमात रुपांतर करण्यात आले आहे.

(२) सदर अधिनियमानुसार नविन औद्योगिक उपक्रम उभारण्याची किंवा विद्यमान औद्योगिक उपक्रम नियमितपणे कार्यान्वित ठेवण्याची इच्छा असलेल्या उद्योजकास आवश्यक परवानग्या मिळविण्यासाठी एक खिडकी प्रणालीमार्फत, इलेक्ट्रॉनिक स्वरुपात अर्ज करता येईल. परवानगीबाबतच्या संबंधित कायद्यान्वये सक्षम प्राधिकाऱ्याने विनिर्दिष्ट कालमर्यादेत निर्णय न घेतल्यास, त्याचे अधिकार समाप्त होतील व असा अर्ज निकाली काढण्याचे अधिकार विकास आयुक्त (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील अधिकारप्रदत्त समितीस प्राप्त होतात.

(३) सदर कायद्याच्या तरतूदींच्या अनुषंगाने पोर्टल तयार करण्याबाबत मे. महाआयटी या संस्थेस कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर पोर्टल तयार करण्यासाठी आवश्यक माहिती त्यांना देण्यात आली आहे. त्यांचेकडून तातडीने काम करुन घेण्याबाबत साप्ताहिक दोन वेळा आढावा बैठका घेण्यात येत आहेत.

या कायद्यांतर्गत तरतूदी जसे की, अधिकार प्रदत्त समितीची रचना, मैत्री पोर्टलमार्फत देण्यात येणाऱ्या सेवा अधिसूचित करणे, सेवांसाठी नियम करणे इ. बाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घोडनकप्पी, भारी गटग्रामपंचायत (ता. जिवती, जि.चंद्रपूर) या आदिवासी नक्षलग्रस्त भागातील गावात मुलभूत सोई-सुविधा नसल्याबाबत

**(२१) ६४६२० (२३-०८-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडनकप्पी, भारी गटग्रामपंचायत (ता. जिवती, जि.चंद्रपूर) या महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील गावात कोलाम व गोंड समुदायाचे आदिवासी ग्रामस्थ बांधव स्वातंत्र्य काळापासून आजतागायत राहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदिवासी भागातील व नक्षलग्रस्त क्षेत्रातील डोंगर कपारीत वसलेल्या गावांत अद्याप रस्ता, पिण्याचे पाणी, पक्की घरे,खाण्यासाठी पुरेसे अन्न, रुग्ण व गर्भवती महिलांसाठी कोणतीच आरोग्यसुविधा नसल्याने रुग्णांना खाटेवर उचलून डोंगरातून दूर रुग्णालयापर्यंत न्यावे लागणे, शाळेत जाण्यासाठी रस्ताच नसणे, इत्यादी मुलभूत सुविधा अद्यापपर्यंत ग्रामस्थांना पुरविण्यात आल्या नसल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदिवासी ग्रामस्थांना मुलभूत सुविधा देण्यात याव्यात, अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी शासनाकडे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त आदिवासी भागातील गावामध्ये मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) तालुका जिवती येथे घोडणकप्पी ते इजीमा ९७ पाटण-गोविंदपूर-नंदप्पा-शंकरपठार-सोरेकसा या मुख्य रस्त्याला जोडणारा ग्रामीण मार्ग २३ या मार्गावरील डोगंरावरील घोडणकप्पी पर्यंत प्रधानमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत रस्त्याचे काम पूर्ण झालेले आहे. डोंगरपायथ्याशी वसलेले घोडणकप्पी पर्यंतचे अंतर ४०० मी. इतके आहे, या रस्त्याचे काम करण्याकरीता अंदाजीत १.५० कोटी रूपये खर्च अपेक्षीत असून जि.प., चंद्रपूर बांधकाम विभागाअंतर्गत सन २०२२-२३

या वर्षांत जिल्हा वार्षीक नियोजन ३०५४ लेखाशीर्षामधून सा.क्र. ०.०० वर पुलाचे काम मंजूर असून सद्यस्थीतीत निविदा प्रक्रीया पूर्ण झालेली आहे. तसेच सन २०२१-२२ मध्ये मौजा घोडणकप्पी येथे अंगणवाडी केंद्राचे बांधकाम पुर्णत्वाचे मार्गावर आहे. त्याचप्रमाणे डोंगरावरील व डोंगरपायथ्याशी असलेल्या घोडणकप्पी येथे सौर पंपावर आधारीत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्धवत नाही.

---

**चौल (ता.अलिबाग, जि.रायगड) ग्रामपंचायतीमध्ये सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामसेवक यांनी गैरव्यवहार केल्याबाबत**

**(२२) ६४६७२ (२३-०८-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चौल (ता.अलिबाग, जि.रायगड) ग्रामपंचायतीमधील सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामसेवक यांनी पदाचा दुरूपयोग करुन मोठया प्रमाणात केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांच्याकडे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८ ते २०२१ या कालावधीतील लेखा परिक्षणाच्या अहवालात उक्त ग्रामपंचायतीमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाले असल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लेखा परिक्षणामध्ये चौल ग्रामपंचायती संदर्भात गंभीर मुद्द्यांची नोंद केली असतांनाही अद्यापी सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामसेवक यांच्यावर कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर ग्रामपंचायतीमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) हे खरे नाही,

ग्रामपंचायत चौल चे सन २०१८-२०१९ ते सन २०१९-२० व सन २०२०-२१ या वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झालेले असून लेखापरीक्षण अहवालात कोणताही आर्थिक गैरव्यवहार किवां गंभीर मुद्दा दिसून आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिचोंडी (ता.येवला जि.नाशिक) औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी प्रचलित दरात विहित मुदतीसाठी सवलत देण्याबाबत**

**(२३) ६४८६५ (२८-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिचोंडी (ता.येवला जि.नाशिक) येथे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी प्रचलित दरात विहित मुदतीसाठी सवलत देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ जून, २०२३ तसेच दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी वा त्या सुमारास मा.मंत्री उद्योग आणि मुख्य कार्यकारी अधिकारी एमआयडीसी मुंबई यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योजकांना ग्रामीण भागातील औद्योगिक क्षेत्रामध्ये गुंतवणुकीसाठी प्रोत्साहित करण्याकरिता प्रश्न भाग (१) प्रमाणे प्रचलित दरात सवलत देण्याकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी योग्य ती कार्यवाही होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०८-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मऔवि महामंडळाच्या दि.०४.०६.२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार येवला औद्योगिक क्षेत्रातील औद्योगिक भूखंड वाटपाचा दर रु.१०५०/- प्रति चौ.मी.आणि व्यापारी भूखंड वाटपाचा दर रुपये २१००/- प्रति चौ.मी. निश्चित करण्यात आला असून, इतर औद्योगिक क्षेत्रांच्या तुलनेत सदर औद्योगिक क्षेत्रात कमी दरात औदयोगिक भूखंड उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हयातील लोटे-परशुराम औदयोगिक वसाहतीचा पाणीपुरवठा बंद झाल्याने कोटयवधींचे नुकसान झाल्याबाबत

**(२४) ६४९७७ (२९-०८-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील लोटे-परशुराम औदयोगिक वसाहतीला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनच्या दुरूस्तीचे काम लांबल्याने दिनांक ३० एप्रिल,२०२३ रोजीपासून ६ दिवस पाणीपुरवठा बंद राहिल्यामुळे कारखानदारांचे कोटयवधी रूपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एमआयडीसीकडून करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठयावर एकूण किती कारखान्यांचे उत्पादन अवलंबून आहे आणि कोणकोणत्या गावांना पाणीपुरवठा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, पाण्याअभावी उत्पादन बंद राहिल्याने मोठया प्रमाणात आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागल्याने एमआयडीसीने उदयोजकांसह ग्रामस्थांना नुकसान भरपाई दयावी, अशी मागणी लोटे-परशुराम उदयोजक संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी नुकसान भरपाई त्वरीत मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०९-११-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर ठिकाणी माहे मे,२०२३ महिन्याच्या सुरुवातीस पाणी पुरवठा करणारी जुनी जलवाहिनी दुरुस्तीच्या कामासाठी शटडाऊन घेण्यात आले होते. तसेच दुरुस्तीच्या कामानंतर पुन्हा जुनी जलवाहिनी फुटल्यामुळे ५ दिवस पाणी पुरवठा खंडीत झाला होता. तथापि, यामुळे कारखानदारांचे आर्थिक नुकसान झालेबाबत कोणतेही पत्र अथवा निवेदन प्राप्त झालेले नाही.
(२) मऔवि महामंडळाकडून लोटे-परशुराम औदयोगिक क्षेत्रातील एकूण ३२१ इतक्या भूखंडधारकांना पाणी पुरवठा करण्यात येत असून, मौजे लोटे, आवाशी, असगणी, धामणदेवी, कोतवली,घाणेखुंट, सोनगाव, पेढे व परशुराम इत्यादी गावांना पाणी पुरवठा करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.

अशा प्रकारचे कोणतेही लेखी निवेदन अथवा मागणी संबंधितांनी केल्याचे दिसून येत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मरणार्थ सामाजिक सभागृह उभारण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(२५) ६५०६८ (२५-०८-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनगर समाजाची मोठी संख्या असलेल्या १४ जिल्ह्यातील ५० गावांमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मरणार्थ सामाजिक सभागृह उभारण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने घेतला असल्याचे दिनांक २८ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सभागृहे उभारण्यासाठी कोणती गावे निश्चित करण्यात आली आहेत,

(३) असल्यास,सदरहू प्रकरणी शासनाने निधी उपलब्ध करुन दिला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मा.मंत्री (ग्रामविकास) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१८/०१/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत ५० नवीन ठिकाणी पुण्यश्लोक श्रीमती अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ सभागृह बांधकामासाठी जिल्हानिहाय पुढील ५० गावांची निवड करण्यात आली आहे. तसेच ज्या गावांची आवश्यक कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत, अशा ठिकाणी कामांची अंदाजपत्रके मागविली आहेत.

| जिल्हा | जिल्हा गावाचे नाव |
|---|---|
| नागपूर (४) | घोराड, रोहणा-ईदरवाडा, केळवद, बेला |
| सातारा (३) | टाकेवाडी, वाठार स्टेशन, कांबळेश्वर |
| अमरावती (१) | वाठोडा शुक्लेश्वर |
| नंदुरबार (१) | म्हसावद |
| जळगाव (१०) | पहूरपेठ, वाकोद, पहुरकसबे, लोहारा,कु-हाड, म्हसावद, शिरसाळा, अहिरवाडी, पाळधी, चहार्डी |
| अहमदनगर (४) | निमगाव घाना, मोहरी, आस्तेगाव, मुकिंदपूर |
| कोल्हापूर (३) | पट्टणकोडोली, अदमापूर, वाशी |
| जालना (४) | घाणेवाडी, टेंभुर्णी, चिंचोली निपाणी, आंनदगाव |
| पुणे (२) | नागरे, जाडकरवाडी |
| नांदेड (५) | माळेगाव,रिसनगाव,शेळगाव(छत्री),वझरगा, नरशी |
| यवतमाळ (५) | पोफळी, मंगलादेवी,चिखलगाव, धनगरवाडी,मारवाडी बु. |
| रत्नागिरी (१) | भरणे |
| सिंधुदुर्ग (१) | तरंदल (धनगरवाडी) |
| चंद्रपूर (६) | खेडी, बेम्बाळ,थुतरा,तेमुर्डा, भंगाराम तळोधी, नवरगाव |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पाचल ग्रामपंचायतीतर्फे खरेदी करण्यात आलेली शुध्दजल मशीन व घंटागाडी विनावापर पडून असल्याबाबत

**(२६) ६५१२७ (२३-०८-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) पाचल ग्रामपंचायतीतर्फे खरेदी करण्यात आलेली शुध्दजल मशीन गेल्या वर्षभरापासून विनावापर पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यात कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी लाखो रुपये खर्च करुन खरेदी करण्यात आलेली घंटागाडीही गेल्या ६ महिन्यांपासून ग्रामपंचायतीच्या इमारतीखाली विना वापर पडून असल्याने ग्रामपंचायत हद्दीत कचऱ्याचे सम्राज्य वाढले असल्याने ग्रामस्थांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने पाचल ग्रामपंचायतीच्या उदासीन कारभाराबाबत संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-१२-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही,

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आडाळी औद्योगिक वसाहतीसाठी अधिसूचित असलेली जमीन परस्पर विकून कोट्यावधीचा अपहार केल्याबाबत

**(२७) ६५२५५ (२९-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडाळी औद्योगिक वसाहतीसाठी अधिसूचित असलेली जमीन परस्पर विकून कोटयवधीचा गैरव्यवहार केला जात असल्याचा आरोप औद्योगिक विकास कृती समितीच्या सचिवांनी केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमआयडीसी व महसूल विभागातील मोठे अधिकारी यांना हाताशी धरुन बनावट सातबारा बनविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आडाळीत क्षेत्र प्रकल्पासाठी अधिसूचित केले असून याठिकाणी प्रकल्प न उभारता परस्पर जमीनी वगळण्यात येणार असतील तर आमच्या जमीनी आम्हाला परत करा अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०६-११-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांमध्ये कामगारांना संरक्षणासंदर्भात धोरण राबविण्याबाबत

**(२८) ६५६२९ (२३-०८-२०२३) श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक क्षेत्रातील १०० पेक्षा जास्त कामगार असलेल्या कारखान्यांमध्ये केंद्र शासनाच्या नव्या कामगार

कायद्यात २९ कामगार कायदे एकत्र करून व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती संहिता सन २०२० च्या चौथ्या कामगार संहितेस राज्य मंत्रिमंडळाने कामगार हिताचे धोरण राबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औद्योगिक क्षेत्रातील १०० पेक्षा जास्त कामगार असलेल्या कारखान्यांमध्ये उपहारगृह, २५० पेक्षा कामगार असलेल्या कारखान्यांमध्ये कल्याण अधिकारी पुरविण्याबाबत तसेच ५० पेक्षा जास्त असलेल्या कारखान्यात महिला कामगारांच्या बालकांसाठी पाळणाघर सुरू करण्यासाठी धोरणात्मक अनुकूल निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सर्व जिल्ह्यात शासनाच्या कामगार विभागामार्फत कामगारांना संरक्षण देण्याकामी कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात आला तसेच उक्त प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०८-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) कामगार हा विषय समवर्ती सूचीमध्ये समाविष्ट असल्याने केंद्र शासनाने सर्व राज्यांसाठी २९ कामगार कायदे एकत्र करुन ४ कामगार संहिता तयार केल्या आहेत. सदर संहितांमधील विविध कलमांन्वये समुचित शासनास संहिता नियम तयार करण्याचे अधिकार संबंधित राज्यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार राज्य शासनाने अ) औद्योगिक संबंध संहिता नियम-२०२० ब) वेतन संहिता नियम-२०१९ क) सामाजिक सुरक्षा संहिता नियम-२०२० व ड) व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता नियम -२०२० या चार संहिता नियमांस मान्यता दिली असून अंतिमत: प्रसिद्ध करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील मुरबाड व अंबरनाथ तालुक्याच्या सरहद्दीवर असलेल्या बारवी धरण विस्थापित शेतकऱ्यांना मोबदला देताना गैरव्यवहार केल्याबाबत

**(२९) ६५८३९ (२९-०८-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील मुरबाड व अंबरनाथ तालुक्याच्या सरहद्दीवर असलेल्या बारवी धरण विस्थापित शेतकऱ्यांना घराचा मोबदला देताना श्री.रामभाऊ बाळकृष्ण बांगर व त्यांचे कुटुंबीय यांनी श्री. अनिल सकट यांच्या नावाने खोटे दस्ताऐवज तयार करून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल.२०२३ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.रामभाऊ बांगर यांनी जनावरांच्या गोठ्याचे मूल्यांकन सुद्धा निवासी घरांचे दाखवून घर क्रमांक २०३, २०४, २४४, २४५, २४६,२६४ आणि २६५ अशा एकूण पाच घरांचा व वन जमिनीचा देखील मोबदला घेऊन मोठया प्रमाणात गैरव्यवहार करणाऱ्या रामभाऊ बांगर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०८-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

बारवी धरणाची उंची टप्पा क्र.३ मध्ये ६८.६० मी. वरुन ७२.६० मी.उंची वाढविण्यात आली आहे. बारवी धरणाची उंची वाढविल्यामुळे प्रकल्पग्रस्तांचे सर्वेक्षण व मुल्यांकन ग्रामपंचायत व तहसिलदार कार्यालयाच्या यादीतील नोंदीनुसार करण्यात आलेली असून, उप विभागीय अधिकारी, कल्याण उपविभाग, कल्याण यांच्या आदेश दि.२६.०२.२०१९ अन्वये घोषीत निवाडयानुसार प्रकल्पबाधितांना मोबदला अदा करण्यात आला आहे.

(२) उप विभागीय अधिकारी,कल्याण उपविभाग, कल्याण यांचे कार्यालयीन आदेश दि.२६.०२.२०१९ अन्वये घोषीत निवाडयानुसार तसेच ग्राम पंचायतीच्या सन २०१५-१६ ते सन २०१८-१९ च्या नमुना ८ कर आकारणी नोंद वहीनुसार घर क्र.२०३, २०४, २४४, २४५,२६४ आणि २६५ निवाडा क्र.१०७६,१०८०,१११४,१११५,१११६,११२७ व ११२८ याप्रमाणे निवासी घरे म्हणून घोषीत करण्यात आली आहेत. ग्रामपंचायत नोंदवही तसेच घोषीत निवाडयामध्ये खालीलप्रमाणे सदर घरांची नोंद असल्यामुळे मुल्यांकनाची रक्कम संबंधितांना अदा करण्यात आलेली आहे:-

| **अ.क्र.** | **घर क्र.** | **घोषीत निवाडा क्र.** | **ग्रा.पं.नोद/घोषीत निवाडयानुसार प्रकल्पबाधितांचे नांव** |
|---|---|---|---|
| १ | २०३ | १०७६ | बाळकृष्ण शंकर बांगर(मयत) सत्यभामा बाळकृष्ण बांगर(वारस) |
| २ | २०४ | १०८० | रामभाऊ बाळकृष्ण बांगर |
| ३ | २४४ | १११४ | संगिता रामभाऊ बांगर |
| ४ | २४५ | १११५ | संगिता रामभाऊ बांगर |
| ५ | २४६ | १११६ | रामभाऊ बाळकृष्ण बांगर |
| ६ | २६४ | ११२७ | रोहन रामभाऊ बांगर |
| ७ | २६५ | ११२८ | संगिता रामभाऊ बांगर |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड येथील एम आय डी सी कार्यालातील रिक्त पदांबाबत**

**(३०) ६६०१४ (२८-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड येथील एमआयडीसी कार्यालयात शिपाई वगळता सर्व ६ पदांवर प्रभारी कर्मचारी कार्यरत असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एमआयडीसी मध्ये नियम मोडणारे व्यापारी, उद्योजक यांच्यावर प्रभारी अधिकारी कोणतीही कारवाई करण्याचे धाडस करीत नसून परिणामी एमआयडीसीच्या विकासाला देखील खीळ बसत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे तातडीने भरून बीड एमआयडीसी कार्यालय पूर्ण क्षमतेने सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०६-११-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

बीड उप विभागाच्या उप अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार छत्रपती संभाजीनगर विभागातील वरीष्ठ सहाय्यक अभियंताकडे सोपविण्यात आला आहे. तसेच कनिष्ठ अभियंता, क्षेत्रव्यवस्थापक,लिपिक, तांत्रिक सहाय्यक या पदांवर कायमस्वरुपी आस्थापनेवरील प्रत्येक एक कर्मचारी नियुक्त केलेले आहेत. या व्यतिरिक्त कामकाजाची व्याप्ती लक्षात घेऊन सहायक या पदावर कंत्राटी पध्दतीने एक कर्मचारी नेमण्यात आला आहे. सध्याचा उपलब्ध कर्मचारीवृंद बीड उप विभागाच्या कामकाजाकरीता पुरेसा आहे.

(२) हे खरे नाही.

सध्या उपलब्ध असलेल्या अधिकारी/कर्मचारी वृंदातर्फे आवश्यक देखभाल/दुरुस्ती,भांडवली कामे, पाणीपुरवठा,पथदिवे इत्यादी सुविधा बाबतची कामे तसेच विशेष नियोजन प्राधिकरणाची कामे व्यवस्थितरित्या करण्यात येत आहेत.

विकास कामांचे प्रस्ताव वेळोवेळी सादर करुन त्यानुसार कामे करण्यात येत आहेत.
(३) मऔवि महामंडळातर्फे नवीन पदे भरण्याकरीता सरळसेवा भरतीची कार्यवाही सुरु आहे. बीड उप विभागातील कामांच्या गरजेनुसार नवीन भरतीतून आवश्यक अधिकारी/कर्मचारी नियुक्त करता येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औढा, कळमनुरी व हिंगोली (जि.हिंगोली) येथील तालुका क्रीडा संकुलास निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(३१) ६६१७३ (२३-०८-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयातील औढा, कळमनुरी व हिंगोली येथील तालुक्या ठिकाणी असलेल्या क्रीडा संकुलांची अपूर्ण असलेली कामे पूर्ण करण्यासाठी १ कोटी निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर क्रीडा संकुलांची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२९-०१-२०२४) :** (१) व (२) तालुका क्रीडा संकुल, औंढा (ना), जि. हिंगोली करिता रु.३९९.९४ लक्ष अंदाजपत्रकास दि. ०२.०३.२०२३ रोजी मान्यता देऊन रु.१५०.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.
तालुका क्रीडा संकुल, कळमनुरी, जि. हिंगोली करीता रु. ४००.०० लक्ष अंदाजपत्रकास दि. ०८.०९.२०२३ रोजी मान्यता देऊन रु.१००.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
तालुका क्रीडा संकुल, हिंगोली, जि. हिंगोली करीता रु. ३९९.९९ लक्ष अंदाजपत्रकास दि. ०२.०३.२०२३ रोजी मान्यता देऊन रु. ३००.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी नवीन एमआयडीसी जिल्यात जागेच्या मोजणी अभावी प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(३२) ६६१७५ (२८-०८-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी तालुक्यातील ब्राम्हणगाव शिवारात कॉटन क्लस्टरसाठी तत्वत: मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नविन एमआयडीसी जागेच्या मोजणीअभावी सदरील प्रकल्प प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परभणी जिल्हयात कापूस उत्पादन अधिक असल्याने कापूस प्रक्रिया उद्योगास मोठा वाव असल्यामुळे सदरील नविन एमआयडीसीला मान्यता देऊन सदरील प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०८-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
दिनांक ०४/१०/२०१६ रोजी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठवाडा विकास महामंडळाची दुय्यम कंपनी, परभणी कृषी गो-संवर्धन मर्यादित यांचेकडील परभणी जिल्हयातील ब्रम्हपूरी तर्फे लोहगांव,ब्राम्हणगाव व रायपूर येथील ६३.९६ हेक्टर जमीन टेक्सटाईल पार्कसाठी मऔवि महामंडळाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.
(२) टेक्सटाईल पार्कसाठी नियोजित असलेली जमीन ही निमुळत्या स्वरुपाची असून, सदर जागेच्या मधोमध आडव्या स्वरुपात मोठा नैसर्गिक नाला वाहतो. तसेच सदर जागेतून रेल्वे मार्ग जात असल्यामुळे जमिनीचे दोन भागात विभाजन होत आहे. सदरहू बाबी विचारात घेता मऔवि महामंडळाच्या भू-निवड समितीने शिफारस केल्यानुसार, सदर नियोजित

जागा औद्योगिक क्षेत्रासाठी विकसित करणे नियोजनदृष्ट्या सुसाध्य व किफायतशीर नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.
(३) सद्य:स्थितीमध्ये परभणी जिल्हयात अति.परभणी (मौजे बाभुळगांव व उजळंबा) व सेलू (मौजे हातगाव,मौजे पिंपरुळा खुर्द व मौजे रावळगांव) औद्योगिक क्षेत्रासाठी भूसंपादन प्रस्तावित असून, सदर भूसंपादनाच्या अनुषंगाने दर निश्चितीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील शिवरी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना बंद असल्याबाबत

**(३३) ६६३०६ (२३-०८-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील शिवरी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना १५ दिवसांपासून बंद असल्याने या योजनेवर अवलंबून असणाऱ्या गावातील नागरीकांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू योजना २० ते २५ वर्षापासून कार्यान्वित असून योजनेच्या पंपाचा सतत बिघाड होत असल्याने पाणी पुरवठा वारंवार खंडीत होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर योजनेसाठी अतिरिक्त नवीन पंप उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२५-०१-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या सदर योजनेची भौतिक प्रगती ४०% असून, आर्थिक प्रगती १८% आहे. तसेच जिल्हा परिषदेमार्फत कुंभारवळण योजनेंतर्गत कऱ्हा नदीकाठी असलेल्या विहिरीचे काम सद्य:स्थितीत चालू आहे. तसेच दाबनलिका व वितरण व्यवस्थाचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाल्हे व माळशिरस (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३४) ६६३४४ (२८-०८-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाल्हे (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील विविध १० पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत

असून कर्माऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच येथे औषध पुरवठाही अपुरा होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच,माळशिरस (ता.पुरंदर,जि.पुणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्मचाऱ्यांच्या अनेक जागा दीड वर्षापासून रिक्त असल्याने सध्या कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामाचा ताण येत असून त्याचा परिणाम सर्वसामान्य रुग्णांना मिळण्या-या आरोग्य सेवेवर पडत असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात शासनाने माहिती घेऊन उक्त रिक्त पदे तातडीने भरुन आरोग्यसेवेचे कामकाज गतीने होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०५-१२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे. वाल्हा, ता.पुरंदर, जि.पुणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात एकूण १५ पदे मंजूर असून यापैकी ८ पदे रिक्त आहेत. तथापि, प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदांच्या ठिकाणी अतिरिक्त कार्यभार देऊन कामकाज केले जात आहे. रुग्णसेवेवर परिणाम झालेला नाही.
(२) हे खरे नाही. प्राथमिक आरोग्य केंद्र वाल्हा, ता.पुरंदर, जि.पुणे या ठिकाणी पुरेशा प्रमाणात औषधसाठा उपलब्ध आहे.
(३) हे अंशत: खरे आहे. माळशिरस, ता.पुरंदर, जि.पुणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात एकूण १५ पदे मंजूर असून यापैकी ९ पदे रिक्त आहेत. तथापि प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदांच्या ठिकाणी अतिरिक्त कार्यभार देऊन कामकाज केले जाते. रुग्णसेवेवर परिणाम झालेला नाही.
(४) ग्रामविकास विभाग जिल्हा परिषदांतर्गत गट-क मधील ३० संवर्गातील १९,४६० पदांची जाहिरात दि.०५ ऑगस्ट, २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यात जिल्हा परिषद, पुणे अंतर्गत आरोग्य विभागाशी संबंधित आरोग्य सेवक (पुरूष), आरोग्य सेवक (महिला), औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ या संवर्गांच्या ७१७ पदांचा समावेश आहे. विविध संवर्गांच्या परिक्षा घेण्याची कार्यवाही सध्या सुरू आहे. त्याचे निकाल प्राप्त झाल्यानंतर त्या त्या संवर्गातील कर्मचाऱ्यांना रिक्त पदी नियुक्ती देण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यशासनाने पुणे येथे स्थलांतरित केलेले फुटबॉल केंद्र पुन्हा कोल्हापुर सुरु करण्याबाबत

**(३५) ६६४५३ (२३-०८-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील शिवाजी स्टेडिअम मधील क्रीडा प्रबोधिनीमध्ये सुरु असलेले फुटबॉलचे केंद्र राज्य शासनाने २२ वर्षापूर्वी कोणतीही पुर्वसूचना न देता पुणे येथे हलविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू केंद्र पुन्हा कोल्हापूर येथे सुरु करण्याची मागणी खेळाडू, पालक आणि फुटबॉल प्रेमींकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार केंद्र पुन्हा कोल्हापूर येथे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२९-०१-२०२४) :** (१) होय,

सन २००० मध्ये सोयी अभावी फुटबॉल खेळाची क्रीडा प्रबोधिनी शिवछत्रपती क्रीडासंकुल, पुणे येथे

स्थलांतरीत करण्यात आलेली आहे.
(२) होय.
(३) क्रीडा प्रबोधिनीचे व्यवस्थापन नियोजनाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी उच्चस्तर धोरण समिती गठीत करण्यात आली आहे. कोल्हापूर येथे फुटबॉल खेळाची प्रबोधनी सुरु करताना आवश्यक सोयी सुविधा जसे कायमस्वरुपी फुटबॉल खेळासाठी मानकानुसार व दर्जेदार क्रीडांगण आवश्यक आहे. ते प्रबोधिनीच्या खेळाडूकरिता सकाळ व सायंकाळ नियमित दैनंदिन सरावासाठी कायमस्वरुपी उपलब्ध असणे आवश्यक आहे. तसेच खेळाडूंना प्रबोधिनीत सुयोग्य निवास व्यवस्था, शैक्षणिक सुविधा इ. सुविधा उपलब्ध करणे अत्यंत आवश्यक आहे. या सर्व सोयी सुविधा कोल्हापूर येथे उपलब्ध झाल्यास प्रस्तुत प्रकरणी उच्चस्तर धोरण समितीच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील गावांसाठी प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना सुरु करणेबाबत

**(३६) ६७०७९ (२३-०८-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा तालुक्यातील (जि.पालघर) अबिटघर सह १७ गावासाठी प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेसाठी केंद्र सरकारच्या जलजीवन मिशन अंतर्गत हर घर नल से जल या महत्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून २५ कोटी १७ लाख ११ हजार ९९० रुपयांच्या अंदाजित खर्चास शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेचे काम सुरू झाले आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त योजनेचे काम किती कलावधीत पूर्ण होईल तसेच ही योजना केव्हापासून सुरु होईल याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०६-१२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
अबिटघर व १७ गावे (ता.वाडा, जि.पालघर) प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या रुपये २५.७० कोटी इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास व आराखडयास दिनांक ०२.०२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(२) होय,
योजनेच्या कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक ३०.०६.२०२२ रोजी देण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत योजनेची भौतिक प्रगती ५५ टक्के इतकी झाली असून, आर्थिक प्रगती ६१.१३ टक्के इतकी आहे. योजनेची उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) योजनेच्या कामाचे कार्यादेश देण्यात आल्यापासून योजना २४ महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सदरहू प्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सरडपार (ता. चिमूर, जि.चंद्रपूर) येथील नेरीलगत असलेल्या गावातील नागरीकांना शासनाच्या योजनेच्या लाभांपासून वंचीत राहावे लागत असल्याबाबत

**(३७) ६७२३६ (२३-०८-२०२३). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सरडपार (ता. चिमूर, जि.चंद्रपूर) येथील नेरीलगत असलेल्या गावाला ग्रामपंचायत नसल्याने नागरीकांना शासनाच्या विविध योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागत असल्याचे माहे मे, २०२३ च मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिमूरला सन २०१५ मध्ये नगरपरिषदेचा दर्जा मिळाल्यानंतर काग व सोनेगाव ही गावे नगरपालिकेत सामाविष्ट करण्यात आली परंतू काग गटग्रामपंचायती मधून राहिलेले सरडपार गाव अद्यापी कोणत्याही गामपंचायतीला जोडण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू गावला ग्रामपंचायतीचा दर्जा मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व संबंधीत विभागाचे मंत्री तसेच जिल्ह्याच्या प्रशासनास वेळोवेळी निवेदन देवूनही उक्त गावास ग्रामपंचायत मिळाली नसल्याने नागरीकांना शासकीय कामांसाठी लागणारी कागदपत्रे मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सरडपार गावाला ग्रामपंचायतीचा दर्जा मिळण्याबाबत व चिमूर नगरपरिषदेत समाविष्ट करण्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सद्यस्थितीत मौजा सरडपार येथील नागरीकांना सेवा व सुविधा पुरविण्याचे काम ग्रामपंचायत म्हसली मार्फत सुरु आहे.
(४) ग्रामपंचायत म्हसलीचा मासिक सभा, ग्रामसभा व स्थायी समिती ठराव नव्याने घेवून मौजा सरडपार हे गाव ग्रामपंचायत म्हसली मध्ये समाविष्ट करणे किंवा सरडपार या गावाला ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांना सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उंबरकोन (ता.इगतपुरी जि.नाशिक) येथे जल जीवन मिशन योजनेअंतर्गत सुरु असलेल्या पाणी पुरवठा योजनेबाबत**

**(३८) ६७४९८ (२३-०८-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उंबरकोन (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथे जलजीवन मिशन योजनेअंतर्गत सुमारे १ कोटी २० लाखांची पाणी पुरवठा योजना सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेअंतर्गत शासनाच्या निकषाप्रमाणे १ हजार लोकसंख्येच्या गावासाठी १२ तासात ४० हजार लिटर पाणी लागणे आवश्यक असून विहिरीला पुरेसे पाणी लागल्याशिवाय पुढचे काम करता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उंबरकोन येथे सदर निकषाप्रमाणे काम झाले नसल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ९ जून,२०२३ रोजी वा त्यासुमारस पाहणी केली असता निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर मतदार संघात अनेक बोगस कामे जलजीवन मिशन योजनेअंतर्गत सुरु असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२५-०१-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

उंबरकोन, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथे जल जीवन मिशन योजनेअंतर्गत अंदाजपत्रकीय रक्कम रु. १ कोटी १६ लक्ष आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सदर उद्धव विहीरीस पुरेसे पाणी लागल्याचे सहायक भुवैज्ञानिक यांनी प्रमाणित केले असून उद्धव विहीरीची क्षमता चाचणी घेण्यात आलेली आहे व त्यानुसार सहायक भुवैज्ञानिक यांचे प्रमाणपत्रानंतरच निकषाप्रमाणे पुढील दाब नलिकेचे काम सुरु करणेत आले होते.

(४) हे खरे आहे.

इगतपुरी तालुक्यातील जल जीवन मिशन योजनेअंतर्गत कामांच्या चौकशीबाबत दिनांक ०४.१०.२०२३ रोजी चौकशी समिती गठित करण्यात आली आहे. सदर चौकशी समितीचा अहवाल अप्राप्त आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरूर व खेड तालुक्यातील खेड विशेष आर्थिक क्षेत्र टप्पा दोन मधील सेझमधून गावे आल्याबाबत

**(३९) ६७७०८ (२८-०८-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरूर व खेड तालुक्यातील खेड विशेष आर्थिक क्षेत्र टप्पा दोन मधील पूर, चौधरवाडी, गोसाशी, वाफगाव, पाबळ, रेटवडी, वरुडे या गावातील एकूण २५७९.८९ हेक्टर क्षेत्र सेझमधून वगळण्यात येणार असल्याचा निर्णय दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास माननीय उद्योग मंत्री यांच्या दालनात झालेल्या विशेष बैठकीत घेण्यात आला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाधित शेतकऱ्यांचे सातबारा कोरे राहण्यास साधारण किती कालावधी लागणार आहे तसेच याकरीता एकुण किती खर्च होणार आहे,

(३) असल्यास, सदर कामास प्रत्यक्ष सुरुवात होऊन ते पूर्ण होण्यास सुमारे किती कालावधी लागणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०८-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे .

(२),(३) व (४) शिरुर व खेड तालुक्यातील खेड विशेष आर्थिक क्षेत्र टप्पा दोन मधील पूर, चौधरवाडी,गोसासी, वाफगाव, पाबळ, रेटवडी व वरुडे या गावातील एकूण २५७९.८९ हेक्टर क्षेत्र विनाअधिसूचित करण्याबाबतची अधिसूचना दि.१७.०४.२०२३ रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच त्यानुषंगाने सदर क्षेत्राचे महसूली अभिलेखात सुधारणा करण्याबाबत दि.१८ एप्रिल,२०२३ च्या शासन पत्रान्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

सदर क्षेत्राची फेरफार अन्वये गाव महसुली अभिलेखात नोंद घेऊन सदर गावांचे ७/१२ वरील मऔवि महामंडळाची नावे (शिक्के) इतर हक्कातून कमी करुन महसुली अभिलेखात सुधारणा करण्याबाबतची कार्यवाही उपविभागीय अधिकारी, खेड उपविभाग(राजगुरुनगर) यांचेकडून करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चीचखंडी (ता. अंबाजोगाई, जि. बीड) या ग्रामपंचायती अंतर्गत रस्त्यांना नंबर देणेबाबत

**(४०) ६७७९६ (२८-०८-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चीचखंडी (ता. अंबाजोगाई, जि. बीड) ग्रामपंचायती अंतर्गत एकूण ०४ रस्ते अत्यंत नादुरुस्त असून सदर रस्त्यांना नंबर नाहीत त्यामुळे रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण कुठल्याही योजनेत करता येत नसल्याने रस्त्याअभावी नागरिकांना दळणवळणाच्या गंभीर समस्या निर्माण होत असून सदर रस्त्यानां त्वरित नंबर देणे बाबतची मागणी स्थानिक

लोकप्रतिनिधी यांनी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचेकडे दिनांक २२ फेब्रुवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारस निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्‌अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०५-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी जिल्हा परिषद, बीड यांना सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेकडून प्रस्ताव तयार करुन शासनास सादर करण्यात येणार आहे. सदरचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात बहुप्रतिक्षीत जिल्हा परिषद भरती प्रक्रिया सुरु करण्याबाबत

**(४१) ६८००६ (२३-०८-२०२३). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बहुप्रतीक्षित जिल्हा परिषद भरती प्रक्रियेसाठीच्या मार्गदर्शक सूचना ग्रामविकास विभागाने प्रसिद्ध केल्या मात्र भरती प्रक्रियेतील जाहिराती कधी प्रसिद्ध होणार याबाबत अद्यापही स्पष्टता नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भरती प्रक्रियेची जाहिरात अद्यापही प्रसिद्ध न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, लवकरात लवकर भरती प्रक्रियेची जाहिरात प्रसिद्ध करून भरती प्रक्रिया सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०५-१२-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२१.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशांनुसार स्पर्धा परिक्षा टि.सी.एस./ आय.बी.पी.एस. या कंपन्याद्वारे ऑनलाईन पध्दतीने घ्यावयाच्या आहेत. त्यानुसार आय.बी.पी.एस. या कंपनीसोबत सामंजस्य करार (MOU) अंतिम करण्यात आले. आय.बी.पी.एस. कंपनीकडून Application Portal विकसित करण्यात येऊन डेमो लिंक तपासून ती अंतिम करण्यात आली. यानंतर ग्रामविकास विभाग जिल्हा परिषदांतर्गत गट-क मधील ३० संवर्गातील १९,४६० पदांची जाहिरात दि.०५ ऑगस्ट, २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. आय.बी.पी.एस. कंपनीकडून वेळोवेळी प्राप्त वेळापत्रकानुसार विविध संवर्गांच्या परिक्षा घेण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बीड विधानसभा क्षेत्रातील जलजीवन मिशन अंतर्गत कामाच्या अनियमिततेबाबत

**(४२) ६८०३८ (२३-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड विधानसभा क्षेत्रातील जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपूरवठा योजनेच्या कामाची एकत्रित निविदा (Club) टेंडर नोटीस नं. १६/२०२२-२३ अंतर्गत काढण्यात येवून त्यानूसार बेलवाडी, काकडहिरा, दहिफळ, कोल्हारवाडी, पोथरा/मुर्शदपूर, मांडवखेल, कोळवाडी, काटवटवाडी, हिंगणी बु., कानडीघाट, सौंदाणा, बाभळवाडी, बोरफडी, चिंचोलीमाळी व इट (ता.बीड) ही गावे एम.टी. फड या कंत्राटदारास तसेच शिरुर का. तालुक्यातील बरगवाडी, खरगवाडी, टाकळवाडी, वंजारवाडी, घुगेवाडी, हाटकरवाडी, आवळवाडी, मलकाचीवाडी, नागरेवाडी, डोळयाचीवाडी, धनगरवाडी ही गावे विजय कन्स्ट्रक्शन, माधवबाग, परळी वै. जिल्हा, बीड या कंत्राटदाराच्या नावे कार्यारंभ आदेश जिल्हा परिषद, बीडने अंतिम केलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही कंत्राटदारांविरुध्द यपूर्वीच्या अनेक कामांबाबत विशेषत: कामे प्रलंबित ठेवल्याबाबत बीड जिल्ह्यात आणि जिल्ह्याबाहेर कामे पूर्ण न करताच मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याच्या तसेच शासनाची दिशाभूल करुन विषयांकित कामाचे कार्यारंभ आदेश मिळविल्याचा आरोप मा. सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनी केल्याच्या तक्रारीबाबतचे निवेदन शासनास दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, झालेल्या निविदेची दुबार तपासणी, स्तरनिहाय होणे बाबत आदेशीत व्हावे व लेखा परीक्षण अहवालासह कामनिहाय, संचिकानिहाय झालेल्या अनियमिततेची त्रयस्त समितीमार्फत तात्काळ शासन निर्णयानुसार गंभीर बाबींची तात्काळ तपासणी व्हावी, या मागणीसंदर्भात तेथील मा. स्थानिक लोकप्रतिनिधी (बीड विधानसभा) यांनी दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये, मा. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, मा. मुख्य सचिव, मा. जिल्हाधिकारी, बीड यांना तक्रार निदेवनपत्रे देऊन तशी मागणी केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर तक्रार निवेदनाच्या अनुषंगाने मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १ जून, २०२३ रोजीच्या निवेदनाद्वारे निविदा भरताना कंत्राटदाराने अनुभव प्रमाणपत्र, बीडकॅपॅसिटी प्रमाणपत्र, आय.टी.आर. आदी प्रमाणपत्रे बोगस, चुकीचे आणि बनावट तयार करुन जोडलेले आहेत. बीडकॅपॅसिटी वाढविण्यासाठी जिल्ह्याबाहेरील वर्क इन हॅण्ड कामांचा चुकीच्या पध्दतीने उल्लेख केला असल्याचे व नळ पाणीपुरवठा योजनांच्या कामात नफ्याची कामे उदा. पाईप खरेदी व इतर यांसारख्या कामांची देयके उचलून उर्वरित कामे चार वर्षे कालावधीपर्यंत प्रलंबित ठेवल्याच्या अनेक तक्रारी केल्या असून त्याबाबत चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार संबंधित दोषी कंत्राटदार व शासकीय अधिकारी यांचेवर कारवाई करण्यासह उक्त विधानसभा क्षेत्रातील जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेची कामे उत्कुष्ट दर्जाची व विहित वेळेत पूर्ण करणेबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१८-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

परंतु, खरगवाडी, ता. शिरुर व ईट, ता.बीड ही गावे एकत्रीत निविदेमध्ये समाविष्ट नाहीत.

(२) संबंधित दोन्ही कंत्राटदारांबाबत यापूर्वीही कुठलीही कामे जिल्हा परिषदेकडे प्रलंबित नाहीत व सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्या तक्रारीही प्राप्त नाहीत.
(३) होय हे खरे आहे.

सदरील झालेल्या निविदेची दुबार तपासणी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर व शासन नियुक्त समितीमार्फत करण्यात आलेली आहे. तसेच वेळोवेळी कामाच्या प्रगतीनुसार त्रयस्थ यंत्रणा टाटा कन्सलटंसी यांचेकडून कामाच्या गुणवत्तेबाबत तपासणी करण्यात येत आहे.

(४) जल जीवन मिशन अंतर्गत बीड विधानसभा क्षेत्रातील गट निविदा प्रक्रिया मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांचे स्तरावर सर्व बाबींची तपासणी करुन अंतिम करण्यात आलेली आहे व त्यांचे निकषाप्रमाणे ई-निविदा स्पर्धात्मक दरांनी मंजूर केलेली आहे. त्यामुळे त्यांचे मान्यतेप्रमाणे जिल्हा परिषद स्तरावर सदर गावांचे कार्यादेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. कार्यारंभ आदेश दिल्यानुसार निविदेमधील अटी व शर्तीच्या अधीन राहुन बीड विधानसभा मतदार संघातील एकत्रित निविदेनुसार झालेल्या नळ पाणी पुरवठयाची कामे शासनाने नियुक्त केलेल्या तांत्रिक सल्लागार, जिल्हा परिषद अभियंते यांचे देखरेखीखाली प्रगतीपथावर आहेत. प्रगतीपथावरील कामांची टप्पानिहाय तांत्रिक तपासणी व गुणवत्ता टाटा कन्सलटींग सर्विसेस यांचेकडून पूर्ण झाल्यानंतर संबंधित ठेकेदारास देयके अदा केली जात आहेत.
(५) बीड जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या जल जीवन मिशन योजनेमधील अनियमिततेबाबची चौकशी करण्यासाठी शासन स्तरावर दिनांक १८.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये समिती गठीत करण्यात आली असून, चौकशी समितीचा अहवाल शासनाने स्वीकृत केला आहे. सदर समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने पुढील कारवाई करणेबाबत विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड आणि अभियान संचालक, जल जीवन मिशन यांना कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील ग्रामपंचायती मधील ग्रामसेवकांची रिक्त पदे तात्काळ भरणेबाबत**

**(४३) ६८५६५ (२३-०८-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील १३३ गावांमध्ये केवळ ६७ ग्रामसेवक असल्याने शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेस वेळेवर मिळत नसल्याने अनेक गावे विकासापासून वंचित राहत असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागातील विकासासाठी ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या निधीची पूर्णपणे अंमलबजावणी होण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीस स्वतंत्र ग्रामसेवकाची मागणी अनेक ग्रामपंचायतीने करूनही स्वतंत्र ग्रामसेवक अथवा ग्रामविकास अधिकारी मिळत नसल्याने ही गावे विकासापासून वंचित राहत असून येथील नागरिकांच्या अनेक समस्या पूर्ण होण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती मधील ग्रामसेवकांची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) रिक्त जागा असलेल्या ग्रामपंचायतीच्या ठिकाणी ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक यांना अतिरिक्त पदभार सोपवून विकास कामे पूर्ण करुन घेण्यात येत आहेत. त्यामुळे सेनगाव तालुक्यातील गावे विकासापासून वंचित राहत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) सेनगाव तालुक्यात एकूण १०७ ग्रामपंचायती आहेत. यात ग्रामविकास अधिकारी संवर्गातील एकूण ८ मंजूर पदांपैकी ३ पदे भरलेली असून ५ पदे रिक्त आहेत. तसेच, ग्रामसेवकांची एकूण मंजूर पदे ६४ असून यातील ६३ पदे भरलेली असून १ पद रिक्त आहे. ग्रामविकास अधिकारी संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्यात येतील. जिल्हा परिषद, हिंगोली अंतर्गत गट-क मधील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याची जाहिरात प्रसिद्ध झाली असून पदभरती प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर ग्रामसेवक रिक्त पद भरण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारकवढे (दक्षिण सोलापूर ) तालुक्यातील ग्रामपंचायतीत कोट्यावधी रुपयांचा अपहार झाल्याबाबत**

**(४४) ६८५९० (२५-०८-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारकवढे (दक्षिण सोलापूर) तालुक्यातील ग्रामपंचायतीत कोटयावधी रुपयांच्या अनियमितेचा प्रश्न पालक मंत्र्यासमोर कार्यकत्यांनी उपस्थित केला असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-१२-२०२३) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी विभागीय चौकशी करण्यात आलेली असून विभागीय चौकशी मध्ये नमूद केलेले आरोप सिद्ध होत

नसलेचे निष्कर्ष आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## स्टेम कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक पदावर निकष डावलून नियुक्ती केल्याबाबत

**(४५) ६८६४९ (२३-०८-२०२३). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्टेम कंपनीत मुख्य कार्यकारी अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक पदी झालेली नियुक्ती भरती प्रक्रियेच्या जाहिरातीत दिलेले निकष डावलून करण्यात आली असून याबाबत दिनांक ०८ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. आयुक्त ठाणे महानगरपालिका तथा अध्यक्ष स्टेम वॉटर डिस्ट्री. अँड इन्फ्रा. कंपनी प्रायव्हेड लिमिटेड, ठाणे यांना निवेदन देऊन चौकशीची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्युत निरीक्षक या पदावर अनुभवी अभियंत्यांची नियुक्ती न करता अपात्र उमेदवाराला नियुक्त केल्याने दिनांक २६ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास मोठा अपघात झाल्याने एका कर्मचाऱ्याला त्याचे प्राण गमवावे लागले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२०-१२-२०२३) :** (१) निवेदन प्राप्त झाले हे खरे आहे. तथापि मुख्य कार्यकारी अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक पदी नियुक्ती निकष डावलून करण्यात आलेली नाही. शासन स्तरावरील निवड समितीमार्फत विहित कार्यपद्धतीनुसार नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(२) कर्मचाऱ्यांचे अपघाती निधन झाले हे खरे आहे. तथापि, स्टेम कंपनीत विद्युत निरिक्षक पद अस्तित्वात नसून शहाड उदंचन केंद्राचे प्रमुख तसेच कार्यक्षेत्रासाठी संपूर्ण जबाबदार अधिकारी हे आवश्यक पात्रता धारण करतात.
(३) दैनंदिन देखभाल दुरुस्ती करतेवेळी अनपेक्षित घडलेली घटना व अपघाताची कारणे याबाबतची चौकशी, स्टेम कंपनी संचालक मंडळाने गठीत केलेल्या चौकशी समितीमार्फत करण्यासाठी संबंधित जबाबदार अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून अंतीम निर्णय चौकशी समितीकडून प्राप्त होणा-या अहवालानुसार घेण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पहुर पुनर्वसन क्र. १ मोहा फाटा कोल्ही - २ मिटनापूर (ता.बाभुळगाव,जि.यवतमाळ) येथील गावांना ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याबाबत

**(४६) ६८८१० (२३-०८-२०२३). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पहुर पुनर्वसन क्र १ मोहा फाटा कोल्ही - २ मिटनापूर (ता.बाभुळगाव. जि.यवतमाळ) बेंबळा प्रकल्पामुळे सदरील गावाचे पुनर्वसन करण्यात आले सदर गावांना महसुली दर्जा प्राप्त आहे. परंतू पंधरा ते वीस वर्षाचा कालावधी होऊनही ग्रामपंचायतीचा दर्जा देण्यात आला नसल्याने अनेक शासकीय योजने पासून नागरिक वंचीत असल्याचे दिनांक २० जून, २०२३ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावातील गरीब लाभार्थांना घरकुल तसेच शासनाच्या अनेक योजना व विकासा करिता निधी मिळतो हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, उक्त गावांना जिल्हा परिषद कार्यालय यवतमाळ यांच्या मार्फत ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याचा प्रस्ताव शासनाकडे दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त प्रकल्पामुळे पुर्नवसित झालेल्या गावांना ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

मिटनापूर पुनर्वसन हे गाव ग्रामपंचायत खडकसांवगाच्या क्षेत्रामध्ये वसले असल्यामुळे सदर गावातील नागरीकांना ग्रामपंचायत खडकसावंगा मार्फत शासकीय योजनांचा लाभ देण्यात येत आहे. पहुर पुनर्वसन क्र.१ मोहा फाटा, कोल्ही २, मिटनापूर (ता. बाभुळगाव, जि. यवतमाळ) येथील नागरीकांना शासकीय योजनेचा लाभ वेळोवेळी देण्यात येत आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) पहुर पुनर्वसन क्र.१ मोहा फाटा, ता. बाभुळगाव, जि. यवतमाळ या महसुली गावांना स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबतच्या प्रस्तावातील प्राप्त त्रुटींच्या पूर्तता अहवालावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच कोल्ही क्र.२ व मिटनापूर ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतचे प्रस्ताव शासनास प्राप्त झालेले नाहीत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मूल (जि.चंद्रपूर) या तालुक्यातील ग्रामपंचायतींना विकासकामासाठी निधीस मंजूरी देवून उक्त ग्रामपंचायतीस वर्ग करणेबाबत

**(४७) ६८८५५ (२३-०८-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मूल (जि.चंद्रपूर) या तालुक्यातील ४९ ग्रामपंचायतींपैकी २९ ग्रामपंचायतींना विकासकामासाठी निधी मंजूर करण्यात आला असून ६० टक्के निधी मागणीचे प्रस्ताव मूळ पंचायत समितीमार्फत जिल्हा परिषदेकडे पाठवून दोन - तीन महिन्याचा कालावधी होवूनही जिल्हा परिषदेने अदयापी निधी वर्ग केला नसल्याने उक्त विकास कामे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर जिल्हापरिषदेकडे प्रलंबित असलेल्या निधीच्या प्रस्तावाला मंजूरी देवून ग्रामपंचायतीस वर्ग करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-१२-२०२३) :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) जनसुविधा अंतर्गत मूल (जि.चंद्रपूर) तालुक्यात सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात एकूण ४१ कामे मंजूर करण्यात आली असून त्या कामांचा ४०% निधी पंचायत समिती, मूलकडे वितरीत करण्यात आलेला आहे.

तद्नंतर पंचायत समिती, मूल यांच्याकडून उर्वरित ६०% निधी वितरीत करण्याबाबत ९ कामाचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. सदर प्रस्तावानुसार दि.२३/०५/२०२३ अन्वये रु.२०,९५,१५६/- इतका निधी वितरीत केला आहे. तसेच, माहे, जून ते सप्टेबर २०२३ या कालावधीत पंचायत समिती, मूल यांच्याकडून ७ कामांचा प्रस्ताव प्राप्त झाला असून सदर कामांचा निधी वितरीत करण्यात आलेला आहे. आजअखेर एकही निधी मागणीचा प्रस्ताव प्रलंबित नसल्याचे जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी दि.१८.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि. ठाणे) तालुक्यात पिण्याच्या पाण्याचे जलजीवन अंतर्गत प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत

**(४८) ६९३२४ (२८-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि. ठाणे) तालुक्यात पिण्याच्या पाण्याचे जलजीवन अंतर्गत १८८ प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जल जीवन चे प्रस्ताव प्रलंबित राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-११-२०२३) :** (१),(२) व (३) नाही हे खरे नाही.

शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत जिल्हा परिषदेमार्फत अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या २०७ योजना व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या ०४ योजना अशा एकूण २११ योजनांचा समावेश आराखडयात आहे.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय दिनांक २९.०६.२०२२ अन्वये निश्चित निकषानुसार त्यापैकी १७९ योजनांचा दरडोई खर्च शासन निकषाच्या आत असल्याने सदर योजनांना जिल्हा पाणी व स्वच्छता समितीने प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. उर्वरीत ३२ योजनांचा दरडोई खर्च हा शासन निकषाच्या वर असल्यामुळे सदर योजनांच्या अंदाजपत्रकास व आराखडयास शासनस्तरावरुन प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

शहापुर तालुक्यातील जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत पाणी पुरवठा योजनांच्या कामांचे ई-निविदा पध्दतीने कार्यादेश देण्यात आलेले असून, सदर योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील आरोग्य केद्रातील रिक्त पदे भरणे तसेच ग्रामीण रुग्णालयातील गैरहजर राहणाऱ्या अधिक्षकांवर कारवाई करणेबाबत

**(४९) ६९७६० (२८-०८-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात पाच प्राथमिक आरोग्य केंद्र असून २६ उपकेंद्रे असून येथे ३१ कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याने कार्यरत असलेल्या कर्मचा-यावर कामाचा ताण येत असल्याचे माहे जून ,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय सुविधा चांगल्या असल्याने येथे रुग्णांची संख्या मोठया प्रमाणात आहे तथापि येथील वैद्यकीय अधिक्षक हे वारंवार गैरहजर राहत असल्यामुळे रुग्णांना आरोग्य सुविधा मिळण्यास अडचणी येत असून येथील अस्वच्छतेवरून स्थानिकांनी बॅनर लावले असल्याची निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंगळवेढा येथील आरोग्य केद्रातील रिक्त पदे भरणे तसेच ग्रामीण रुग्णालयातील गैरहजर राहणाऱ्या अधिक्षकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०५-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. ग्रामीण रुग्णालय, मंगळवेढा येथे अस्वच्छतेबाबत स्थानिकांनी बॅनर लावले होते. उपलब्ध सफाईगारांमार्फत तसेच गरजेनुसार रोजंदारी तत्वावर स्वच्छता करुन घेऊन रुग्णालय स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येतो. ग्रामीण रुग्णालय, मंगळवेढा येथे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात.

(३) ग्रामविकास विभाग, जिल्हा परिषद अंतर्गत गट-क संवर्गांतील रिक्त १९,४६० पदांच्या सरळसेवा पदभरतीची कार्यवाही सुरू आहे. यात जिल्हा परिषद, सोलापूर अंतर्गत आरोग्य विभागातील संवर्गांसह इतर संवर्गांतील एकूण ६७४ पदांचा समावेश आहे. ग्रामीण रुग्णालय, मंगळवेढा येथील समस्यांबाबत वर्तमानपत्रात बातमी प्रसिद्ध झाली होती. त्यानुषंगाने जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सोलापूर यांनी ग्रामीण रुग्णालय, मंगळवेढा येथे स्वत: भेट देऊन वैद्यकीय अधिक्षक यांना रुग्णालयात नियमित उपस्थित राहणेबाबत व रुग्णालयीन कामकाजात तक्रारी होणार नाहीत याची दक्षता घेण्याबाबत सक्त ताकीद देण्यात आली आहे. तसेच कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्ह्यातील तब्बल १२३ गावांत स्मशानभूमीची व्यवस्था नसल्याबाबत**

**(५०) ६९९८३ (२५-०८-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील तब्बल १२३ गावांत स्मशानभूमीची व्यवस्था नसल्याचे दिनांक २१ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, गावात स्मशानभूमीची व्यवस्था नसल्याने स्थानिक नागरिकांना मृतदेहावर उघड्यावर, नदीच्या काठावर अथवा अन्य गावांत नेवून अंत्यसंस्कार करावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले तद्अनुषंगाने नागपूर जिल्ह्यात स्मशानभूमीचा अभाव असलेल्या गावांत तातडीने स्मशानभूमी उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-१२-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
नागपूर जिल्ह्यातील १६१ गावांत स्मशानभूमीची व्यवस्था नसल्याने जागा उपलब्ध करून देण्याबाबत महसूल व वन विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत.
तसेच लेखाशीर्ष २५१५ १२३८ या योजनेंतर्गत मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना शासन मान्यतेने मंजूरी देण्यात येते. नागपूर जिल्ह्यासाठी स्थानिक मा. लोकप्रतिनिधींची मागणी विचारात घेऊन शासन मान्यतेने सन २०२३-२४ मध्ये रु. ३७१५.०० लक्ष रक्कमेच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. लेखाशिर्ष २५१५ १२३३८ योजनेंतर्गत सदर विकास कामे घेण्यास मा.लोकप्रतिनिधींना मुभा आहे. सबब, योजनेतील अटी व शर्तीनुसार त्यातून सदर विकास काम करणे शक्य आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.